## प्रसिध्दी पत्रक

दिनांक : २०/०९/२०२४

**लोकसेवक ईश्वर बालाजी डफडे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे औराळ ता. कंधार जि. नांदेड यांनी नमुना नंबर ८ देण्यासाठी ३,५००/- रुपयांची लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | पो स्टे कंधार जि नांदेड |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं ३१४/२०२४ कलम ७ भ्र प्र अ १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २०.०९.२०२४ रोजी ०४.५९ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | ईश्वर बालाजी डफडे वय ३६ वर्षे व्यवसाय नोकरी पद- ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे औराळ ता. कंधार जि. नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,५००/- रुपये |
| लाच स्विकारली रक्कम | ३,५००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना बँकेचे कर्ज घेण्यासाठी नमुना नंबर ८ ची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी ग्रामसेवक मौ. औराळ, ता. कंधार, जि. नांदेड यांच्याकडे त्यांचे प्लॉटचा नमुना नंबर ८ मिळण्यासाठी दिनांक १८/०९/२०२४ रोजी अर्ज दिला होता. तेव्हा ग्रामसेवक यांनी त्यांना नमुना नंबर ८ देण्यासाठी ३५००/- रुपयाची मागणी केली. सदरची रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १८/०९/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली.<br>नमुद तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांचे कडून दिनांक १९/०९/२०२४ रोजी लाच मागणीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना नमूना नंबर ८ देण्यासाठी पंचासमक्ष ३५००/- रुपयाची लाचेची मागणी केली.<br>त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक ईश्वर बालाजी डफडे, व्यवसाय नोकरी, पद -- ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौ. औराळ, ता. कंधार, जि. नांदेड यांनी तक्रारदार यांचेकडून त्यांचे राहते घरी संभाजी नगर, कंधार, ता. कंधार, जि. नांदेड येथे ३५००/- रुपये पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ मिळून आले. त्यावरुन आरोपी लोकसेवक यास ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन कंधार, जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती माधुरी यावलीकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क कमांक :- 02462-253512<br>टोल फ्री कमांक- 1064 | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई-मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई-मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner